# MT

Seat No. | | | | | | | |

2018 .... .... 1100

MT - MARATHI (SECOND OR THIRD LANGUAGE) (M) - SEMI PRELIM - I - PAPER - V

**Time : 3 Hours** **(Pages 9)** **Max. Marks : 100**

## विभाग १ – गद्य

**प्र.१ अ. खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) (i) **एका वाक्यात उत्तर लिहा.** 1

निरंजनाच्या काय ध्यानी आले ?

(ii) **कंसातील योग्य शब्द वापरून रिकामी जागा भरा.** 1

या ............. जाणं-येणं सोपं झालं होतं.

(मार्गामुळं, रस्त्यामुळं, वाटेमुळं, पुलामुळं)

मावशीचं घर गावाबाहेर डोंगरपायथ्याशी. मध्ये एक नदीही लागायची. पूर्वी ही नदी पाण्यात उतरूनच चालत चालत पार करायला लागायची; परंतु आता कोकण रेल्वे आल्याने रेल्वेचा छान पूल नदीवर आला. पुलाच्या एका बाजूने लोकांसाठी पायवाटही ठेवली होती. या पुलामुळं आता जाणं-येणं सोपं झालं होतं. निरंजन अभ्यासाची मनातल्या मनात उजळणी करत झपाझप चालला होता. वाटेत त्याला भला मोठा दगड पडलेला दिसला. कुणीतरी कामासाठी घेतला असेल आणि पुन्हा तसाच ठेवून दिला असेल. निरंजनने तो दगड उचलून बाजूला ठेवला. त्याला लोकांच्या या बेफिकीर प्रवृत्तीचा भयंकर राग येई. तुम्ही विसरलात; पण दुसरा ठेचकाळून जीवाला मुकतो त्याचं काय! असंच त्याचं म्हणणं. निरंजन पुलावर पोहोचला तेव्हा साडेनऊ वाजून गेले असावेत. आता नऊ पन्नासची गाडी येईल. धाड्धाड् आवाज करत दिमाखात पुलावरून जाईल. ही कोकण गाडी किती छान दिसते; पण दिसते न दिसते तोच लगेच बोगद्यात शिरते. काय मजा येत असेल नाही गाडीतून जायला ? आपणही मोठं झाल्यावर गाडीतून फिरू, या विचाराने तो हुरळून गेला. तोच त्याचं लक्षं डाव्या बाजूस रुळाखाली पडलेल्या भल्या मोठ्या भगदाडाकडे गेलं. हे छिद्र कसलं ? रोज नसतं बुवा, असं म्हणत त्यानं जवळ जाऊन पाहिलं तो कुणीतरी काँक्रीट फोडून रेल्वेचे रूळ वेडेवाकडे करून ठेवल्याचं त्याच्या ध्यानी आलं. निरंजनला आश्चर्यच वाटलं.

रात्री दोन वाजता शेवटची गाडी इथून जाते. त्यानंतर पहाटेस कुणीतरी हा उपद्व्याप जाणीवपूर्वक केला असावा. आता प्रवाशांनी भरलेली नऊ पन्नासची गाडी येईल.

(२) **खालील घटनांचे परिणाम लिहा.** 2

| घटना | परिणाम |
|---|---|
| (i) आता नऊ पन्नासची गाडी येईल. | |
| (ii) दगड बाजूला ठेवायचे विसरलात. | |

(३) **व्याकरण :**

**(i) अधोरेखित शब्दाची जात ओळखा.** 1

मावशीचं घर गावा<u>बाहेर</u> डोंगरापाशी आहे.

**(ii) समानार्थी शब्द लिहा.** 1

१. सरिता – [ ] २. नवल – [ ]

(४) **स्वमत :** 2

तुमच्या खबरदारीने भावी धोका टळला, असा प्रसंग तुमच्या शब्दात मांडा.

**प्र.१ आ. खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) **आकृतिबंध पूर्ण करा.** 2

(i)

**लेखकाच्या खेळाबाबत स्तुतीपर उद्गार ऐकून यांना आनंद वाटे.**

↓

[ ]

(ii)

**लेखकाचे वडील याबाबतीत कडक होते.**

↓

[ ] [ ]

त्यानंतर एक आनंदाची गोष्ट घडली. माझ्या वडिलांची बदली परत पुण्यास झाली. माझ्या आई-वडिलांना वाय.एम.सी.ए. मधील खेळाडूंकडून माझ्याखेळाबाबत स्तुतीपर उद्गार ऐकू येऊ लागले ते ऐकून त्यांना आनंद वाटे.माझे वडिल स्वत: व्हॉलीबॉल चॅम्पियन होते. त्यामुळे ते मला खेळात नेहमीच प्रोत्साहन देत. एकदा दुपारी त्यांना जेवणाचा डबा घेऊन गेलो असताना त्यांनी मला दुकानात नेले व सहा रूपयांस एक जुनी बॅट विकत घेऊन दिली. ती बॅट पाहून माझा आनंद गगनात मावेना. मी तसाच ती बॅट घेऊन मित्रांना दाखवत सुटलो. त्या वेळेस वडिलांचा मासिक पगार अवघा चोवीस रूपये होता. माझे वडील अभ्यास व शाळा यांबाबतीत फारच कडक असत. एकदा मी शाळा चुकवून ग्राऊंडवर क्रिकेटचा एक मित्रत्वाचा सामना पाहत बसलो होतो. वडील घरी आले तेव्हा त्यांनी मला पाहिले व संतापाने छड्या मारत शाळेत नेऊन बसवले. त्या क्षणापासून मी शाळा कधीच चुकवली नाही.

१९४५ साली भारतात ऑस्ट्रेलियन सर्व्हिसेसचा एक क्रिकेट संघ पुण्यात आला होता. पूना क्लबच्या ग्राऊंडवर त्याची एक मॅच झाली. या सामन्याला अर्थात तिकीट होते व मैदानावर गोलाकार कनात घालण्यात आलेली होती. त्यामुळे आत जाण्याचे सर्व मार्ग बंद होते. ही मॅच तर पाहायलाच पाहिजे आणि तिही फुकटात, म्हणून माझी धडपड सुरू झाली. सुदैवाने हा प्रश्न ग्राऊंडच्या बाजूला असलेल्या मोठाल्या झाडांनी सोडवला.

(२) (i) **कारण लिहा.** 1

वडिलांनी संतापाने लेखकास छड्या मारल्या.

(ii) **एका वाक्यात उत्तर लिहा.** 1

लेखकांचे वडील कोणत्या खेळात चॅम्पियन होते ?

(३) **व्याकरण :**

(i) **खालील वाक्यातील क्रियापद ओळखा व लिहा.** 1

मला खेळात नेहमी प्रोत्साहन देत.

(ii) **काळ ओळखा.** 1

पूना क्लबच्या ग्राऊंडवर सामना चालू आहे.

(४) **स्वमत :** 2

लेखकाच्या वडिलांची शिस्त जाणवलेले प्रसंग पाठाच्या आधारे तुमच्या शब्दांत लिहा.

**अपठित गद्य**

**प्र.१ इ. खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) **खालील कृती पूर्ण करा.** 2

(i) खरा ध्येयवादी याला म्हणावा - [ ]

(ii) आफ्रिकेत धर्मोपदेश करणार नाही तर - [ ]

कशासाठी काय सोडायचे हे ज्याला बरोबर कळते तोच खरा ध्येयवादी. तिथेच त्याचा खरा कस लागत असतो. 'मी आफ्रिकेत धर्मोपदेश करणार नाही. फक्त वैद्यकीय मदतीचे काम करीन' असे वचन डॉ. श्वाइत्झर यांनी दिले होते आणि पियानोची पेटी उघडून पाहायलाही त्यांना कित्येक दिवस सवड मिळाली नाही. लोकमान्य टिळक नेहमी म्हणत असत, 'देशाच्या स्वातंत्र्याचा लढा मला लढायचा नसता तर मी गणिताचा प्राध्यापक होऊन राहिलो असतो.' गणित हा लोकमान्यांचा आवडता विषय. पण देशाच्या सेवेसाठी त्यांनी तो सोडून दिला. ध्येयापुढे आवड बाजूला सारावी लागते. आवड म्हणजे तरी सुखच, ध्येयाशी मैत्री करावयाची तर सुखाची संगत सोडावीच लागणार. संत तुलसीदासांनी प्राणापलीकडे प्रेम असलेली पत्नी देवासाठी सोडली. देवाच्या सेवेसाठी पत्नीचा त्याग केला आणि धर्माच्या सेवेसाठी संभाजी महाराजांनी तर देहत्याग केला.

(२) **फक्त नावे लिहा.** 2

(i) लोकमान्य टिळक यांचा आवडीचा विषय - [ ]

(ii) संत तुलसीदासांनी यांचा त्याग केला - [ ]

(iii) ध्येयाशी मैत्री करायची तर हे सोडावे लागते - [ ]

(iv) धर्माच्या सेवेसाठी संभाजी महाराजांनी त्याग - [ ]

(३) **व्याकरण :**

**खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांचे वचन बदलून वाक्य लिहा.** **2**

(i) फक्त वैद्यकीय मदतीचे काम करीन.

(ii) ध्येयापुढे आवड बाजूला सारावी लागते.

(४) **स्वमत :** **2**

'संत तुलसीदास' यांच्याबद्दल तुम्हाला माहीत असलेली माहिती लिहा.

## विभाग २ – पद्य

**प्र.२ अ. खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) (i) **आकृतिबंध पूर्ण करा.** **1**

**झाड कोणाप्रमाणे नवीन वस्त्र धारण करते** → [ ]

(ii) **कंसातील योग्य शब्द वापरून रिकामी जागा भरा.** **1**

............. झाडांचे कुणीच नसतात तरीही झाड त्याचं असतं.

(प्राणी, माणसे, पक्षी, किटक)

झाड बसते ध्यानस्थ ऋषिसारखं मौन व्रत
धारण करून तपश्चर्या करत...
पक्षी झाडांचे कुणीच नसतात
तरीही झाड त्यांचं असतं
मुळावर घाव घातला तरी झाड मुकाट सहन करते
झाडांच्या पानावरून वहीच्या पानावर
अलगद उतरतात दवांचे टपोरे थेंब
झाडाकडे टक लावून पाहिलं तर
शरीरभर विरघळतो हिरवा रंग
रक्त होते क्षणभर हिरवेगार
आयुष्य होतं नुकत्याच खुडलेल्या फुलासारखं टवटवीत
झाडाचे बाहु सरसावलेले असतात मुसाफिरांना कवेत घेण्यासाठी
पानझडीनंतर झाड पुन्हा नवीन वस्त्र धारण करतं
नव्या नवरीसारखं
झाडाला पालवी फुटल्यावर फुटते शरीरभर पालवी
अन झटकली जाते मरगळ
पक्ष्यांच्या मंजुळ नादात झाडाचंही जीवनाचं
एक संथ गाणे दडलेले असते
हसावं कसं सळसळत्या पानासारखं
मुळावं मुरावं कसं तर ? झाडासारखं घट्ट पाय रोवीत
जगावं कसं तर ? हिरवंगार झाडासारखं
रोजचं चिंतन करावं कसं तर झाडासारखं !

(२) (i) **सहसंबंध लिहा.** 1

शरीरभर विरघळतो : हिरवा रंग : : क्षणभर रक्त :..........

(ii) **खालील प्रश्नाचे उत्तर एका वाक्यात लिहा.** 1

झाड कोणासारखे बसते ?

(३) **पुढील ओळींचे अर्थसौंदर्य स्पष्ट करा.** 2

'झाडाचे बाहु सरसावलेले असतात मुसाफिरांना कवेत घेण्यासाठी'

(४) **'झाडापासून आनंदी जीवन जगणे शिकावे', या विधानातील विचार स्पष्ट करा.** 2

**प्र.२ आ. खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) (i) **समान अर्थाची काव्यपंक्ती शोधून लिहा.** 1

कष्टाचे सामर्थ्य ही अंगी नाही, म्हणून काय करावे सुचत नाही.

(ii) **आकृतिबंध पूर्ण करा.** 1

ज्योत ज्योत पाजळावी → [ ]

नाही मुठीमध्ये द्रव्य
नाही शिरेमध्ये रक्त,
काय करावें कळेना
नाही कष्टाचे सामर्थ्य;
जीव ओवाळावा तरी
जीव किती हा लहान;
तुझ्या शौर्यगाथेपुढे
त्याची केवढीशी शान;
वर घोंघावे बंबारा,
पुढे कल्लोळ धुराचे,
धडाडत्या तोफांतून
तुझें पाऊल जिद्दीचें;
तुझी विजयाची दौड
डोळे भरून पहावी
डोळ्यांतील आसवांची
ज्योत ज्योत पाजळावी
अशा असंख्य ज्योतींची
तुझ्यामागून राखण;
दीनदुबळ्याचं असें
तुला एकच औक्षण.

(२) (i) **खालील प्रश्नाचे उत्तर एका वाक्यात लिहा.** 1

जवानाचे रक्षण कसे होणार आहे ?

(ii) **'दीनदुबळ्यांचे' उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.** 1

(३) सैनिक सीमेवर तैनात असतो, म्हणून आपण सुरक्षित राहतो, या विधानातील भाव स्पष्ट करा. 2

(४) **खालील काव्यपंक्तीतील आशयसौंदर्य स्पष्ट करा.** **2**

जीव ओवाळावा तरी
    जीव किती हा लहान;
तुझ्या शौर्यगाथेपुढे
    त्याची केवढीशी शान;

**प्र.२ इ. खालील ओळींचे रसग्रहण करा.** **4**

(१) हजार आम्ही एकी बळकट
सर्वांचे हो एकच मनगट
शक्तीचीही झडते नौबत
घराघरांतून जन्म घेतसे तेज नवा अवतार।।

## विभाग ३ – स्थूलवाचन

**प्र.३. खालील कोणत्याही दोन कृती सोडवा.** **6**

(१) 'निसर्ग हा मोठा जादूगार आहे', हे विधान वाळवंटी प्रदेशाच्या संदर्भात कसे लागू पडते, ते पाठाच्या आधारे सविस्तर लिहा.

(२) टिपा लिहा. – व्युत्पत्ती कोशाचे कार्य.

(३) टिपा लिहा.

**सग्वारो कॅक्टस**
- सग्वारो कॅक्टसचे दिसणे
- सग्वारो कॅक्टसचे उपयोग

## विभाग ४ – भाषाभ्यास

**प्र.४ (अ) भाषाभ्यासावर आधारित कृती**

(i) **समास** **2**

**खालील तक्ता पूर्ण करा.**

| अ.क्र. | सामासिक शब्द | विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|---|
| (i) | आजन्म | --------------- | --------------- |
| (ii) | सत्यासत्य | --------------- | --------------- |

(ii) **अलंकार** **2**

खालील उदाहरण कोणत्या अलंकाराचे आहे हे ओळखून त्याच अलंकाराचे दुसरे उदाहरण लिहा.

**उदा.** नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी ।।

(iii) **वाक्यरूपांतर** **2**

**कंसातील सूचनेप्रमाणे वाक्य परिवर्तन करून लिहा.**

१. आमच्याजवळ एवढे पैसे कुठून येणार ? (विधानार्थी करा.)

२. रांगेत उभी राहिली, तशीच ताटकळत. (आज्ञार्थी करा.)

(iv) **सामान्यरूप** **2**

**कंसात दिलेल्या शब्दांचे सामान्यरूप करून वाक्ये पुन्हा लिहा.**

१. देवळाच्या (पुजारी) कडे लोक गेले.

२. अमोल (बाग) त खेळत होता.

(v) **वाक्प्रचार** **2**

**खालील वाक्प्रचार वाक्यात योग्य ठिकाणी वापरून वाक्ये पुन्हा लिहा.**

(किमया करणे, भुरळ घालणे, हृदयाशी धरणे)

१. मला महाबळेश्वरच्या डोंगररांगांनी मोहून टाकले.

२. पावसाळ्यातील इंद्रधनुष्याने माझ्या मनावर जादू केली.

**प्र.४ (ब) स्वाध्यायावर आधारित कृती.**

**(१) शब्दसंपत्ती** **1**

(i) **समानार्थी शब्द लिहा.**

१. उसंत - ............ २. आहार - ............

(ii) **विरुद्धार्थी शब्द लिहा.** **1**

१. गोड × ☐ २. थंडी × ☐

(iii) **खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा.** **1**

भाषण करण्याची जागा - ☐

(iv) **एका शब्दाचे भिन्न अर्थ लिहा.** **1**

☐ ← जग → ☐

**(२) लेखननियमांनुसार लेखन**

(i) **अचूक शब्द ओळखून लिहा.** **1**

१. लिबोणी, लिंबोनी, लिंबोणी, लींबोणी

२. साहित्यीक, साहित्यिक, साहीत्यीक, साहित्यकी

(ii) **खालील वाक्य लेखननियमानुसार शुद्ध करून लिहा.** **1**
त्याच्या हाति पोटस्मनने दिलेले पत्र होते.

(३) **विरामचिन्हे**
**खालील तक्ता पूर्ण करा.** **2**

| विरामचिन्हे | नाव |
|---|---|
| (१) (!) | .................. |
| (२) (-) | .................. |
| (३) (:) | .................. |
| (४) (‘......’) | .................. |

(४) **पारिभाषिक शब्द**
**खालील शब्दांना पारिभाषिक शब्द लिहा.** **1**
१. Lift - २. Mobile -

(५) **भाषिक खेळ**
**खालील शब्द अकारविल्हेनुसार लावा.** **1**
औषध, रुग्णालय, दवाखाना, परिचारिका

**विभाग ५ – उपयोजित लेखन**

**प्र.५ अ. खालील कृती सोडवा.**
(१) **पत्रलेखन** **5**
**खालील निवेदन वाचा व संबंधित व्यक्तीस विनंती करणारे पत्र विद्यार्थी म्हणून लिहा.**

मा. मुख्याध्यापक,
केळकर विद्यामंदिर,
राजापूर,
जि. रत्नागिरी.
गरीब विद्यार्थी फंडातून गणवेश
व शैक्षणिक
साहित्य मिळण्याबाबत विनंती पत्र.

(२) **सारांश लेखन** **5**
**खालील उतारा वाचा व त्याच्या एकतृतीयांश एवढा सारांश तुमच्या शब्दात लिहा.**
कुठून कुठून माणसं येतात, वस्ती करतात, माणसांच्या वाढत्या संख्येबरोबर शहर वाढतं हे समजलं, तेव्हा रस्ते, वीज,पाणी, बस अशा सगळ्यांमुळे शहर विस्तारतं, हे पक्कं अनुमान भलतचं ठिसूळ झालं. म्हणजे हे अनुमान खोटं नव्हतं; पण या साऱ्यांशिवायही शहर वाढतं–विस्तारतं, हेही खरं. रस्ते,वीज, पाणी

बस या गरजांपेक्षा माणसांच्या पोटापाण्याच्या गरजा मोठ्या असतात, जगण्याच्या आशा – अपेक्षा मोठ्या असतात. शहर या गरजांवर, आशा – अपेक्षांवर वाढतं. माणसं शहरात जमेल तिथे, जमेल तसा आसरा शोधतात. फुटपाथवर, रस्त्याच्या कडेला, नदीच्या काठाला, पुलाच्याखाली संसार मांडतात. शहर केवळ बंगले, इमारती, संकुलांमधून निवांत श्वास घेतं असं नाही, तर झोपडवस्त्यांमधून अस्वस्थ उच्छ्वासही सोडत असतं.

**प्र.५ आ. खालील कृती सोडवा.**

**(१) बातमी लेखन** **6**

**खाली दिलेल्या विषयावर बातमी तयार करा.**

**विषय :** सर्व शिक्षा अभियान, शिक्षण विभाग ठाणे आयोजित "आरोग्य, स्वच्छता व हितगुज मेळावा"

**(२) कथा लेखन** **6**

दिलेल्या शीर्षकावरून कथा तयार करा.

करावे तसे भरावे.

**प्र.५ इ. लेखनकौशल्य**

**खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा. (१०० ते १२० शब्द)** **8**

**(१) मला पंख असते तर ....**

१. पंख असावेत असे का वाटते ?

२. शहरातील रस्त्यावरची रहदारी टाळता येईल.

३. पटकन हवे तेव्हा कोठेही जाता येईल.



४. शाळेत वेळेवर पोचता येईल.

५. पंखांमुळे कोणत्याही झाडावर जाऊन फळे मिळतील.

६. कोणी रागावले, भांडले तर उडून जाता येईल.

७. आई, बाबा, शिक्षकांची फजिती - पण आकाशात सुद्धा पक्षी चिडतील - चोचींचा मार.

**(२) विदूषकाचे आत्मवृत्त**

१. परिचय

२. बालपण

३. जबाबदारीचे ओझे



४. सर्कसमध्ये नोकरी

५. प्रशिक्षण

६. मिळणारा आनंद

७. सेवाभाव हेच ध्येय, अनुभव

८. समाधानी

**Best Of Luck**